Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

February -2022

(CCCXXXVII) 337

## The Contribution Of The Great Thinkers And Saints In The Making Of India



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor
Dr. Maya S. Watane
Head, Dept. of Political Science
Smt. Kesharbai Lahoti
College, Amravati

Executive Editor
Dr. V. L. Bhangdia
Principal
Smt. Kesharbai Lahoti
College, Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Dept. of Political Science
Smt. Kesharbai Lahoti College, Amravati

For Details Visit To : www.aadharsocial.com Aadhar International Publication

| | | |
|---|---|---|
| 20 | राष्ट्रनिर्मितीत लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रवादाचे योगदान डॉ. बविता येवले | 85 |
| 21 | महात्मा गांधी यांचे स्वातंत्र्य लढयातील योगदान प्रा.डॉ. तिर्थनंद बन्नगरे | 88 |
| 22 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्तीदर्शन : राष्ट्रसंतांचा जीवनप्रवास डॉ. साहेबलाल एच. भैरम | 93 |
| 23 | भारतीय विचारवंताचे व संताचे भारताच्या जडणघडणीत योगदान संत तुकाडोजी महाराज यांचे शैक्षणिक कार्य प्रा. डि. बि. भुईभार | 95 |
| 24 | भागवत धर्माची पताका —संत ज्ञानेश्वर डॉ. चैनलाल एस. राणे | 99 |
| 25 | वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे राजकीय व सामाजिक योगदान प्रा. मनोज के. सरोदे | 103 |
| 26 | स्वतंत्र प्रज्ञेचे विचारवंत : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रा. डॉ. वैशाली बाबुराव कोटंबे | 108 |
| 27 | राष्ट्रीय चळवळ: महात्मा गांधी डॉ. शर्मीला अशोक साबळे | 111 |
| 28 | छत्रपती शाहू महाराज यांचे विविध क्षेत्रात मोलाचे योगदान प्रा.डॉ. लखपती वा. गायकवाड | 118 |
| 29 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार व कार्ये डॉ.जयवंत पिराजी जुकरे | 120 |
| 30 | स्वामी विवेकानंदांचे शिक्षण विषयक विचार सहा. प्रा. राजाराम नामदेव निगडे/डॉ. महेश नारायणराव मोटे | 125 |
| 31 | कर्मयोगी संत गाडगे महाराज : एक अदभूत रसायन प्रा. निकेश दिगांबरराव काळे | 128 |
| 32 | संत कवयित्री जनाबाईच्या अभंगातील सामाजिकत प्रा. डॉ. नरेंद्र पाखरे | 132 |
| 33 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक दृष्टिकोनाचे अद्ययन. प्रा.डॉ.रमेश इंगोले | 135 |
| 34 | राष्ट्रसंतांची ग्रामोध्दारक चळवळ प्रा.डॉ. दिनेशचंद्र की. राऊत | 138 |
| 35 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बौध्द धम्म विषयक कार्य प्रा. सतोष मारोतराव रामटेके | 142 |
| 36 | गांधी प्रतिविंवित महिलाओं कि सहभागिता : एक चिंतन सतीश माधवराव वाटाणे | 148 |
| 37 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज के काव्य में सामाजिक चेतना प्रा. डॉ. सुशांत एस. ठोके | 152 |
| 38 | भारतीय जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकराची सामाजिक कार्ये प्रा. सुजाता पाटील | 155 |
| 39 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाचे शिक्षण विषयक विचार प्रा.सौ.सुषमा सु.जाजु | 161 |
| 40 | आधुनिक भारताच्या जडण घडणीत छत्रपती शाहु महाराजांचे योगदान प्रा. प्रमोद रामकृष्ण तायडे | 165 |
| 41 | डॉ.बाबासाहेब आंबेकडरांचे षैक्षणिक क्षेत्रातील योगदान डॉ.विजय रामदास तिरपुडे | 168 |

'B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 337(CCCXXXVII)
ISSN : 2278-9308 February, 2022

# राष्ट्रसंतांची ग्रामोध्दारक चळवळ

प्रा.डॉ. दिनेशचंद्र की. राऊत
युवाशक्ती कला व विज्ञानमहाविद्यालय, अमरावती. भ्रमणध्वणी - ९७६४६८८१५८

दुमदुमवा कानोकानी ही ग्रामगीतेची वाणी। सृज हो।
सेवा ही क्रांतिमय येथे नवविश्वाची उदया येते यातुनी।।
ईश्वरी राज्य न्यायाचे। शोषणादि विरहितसाची गाविया
प्रत्यक्ष फलश्रुती लाभे। वैकुंठ भूवरि शोभे राष्ट्रीया ।।
अवतार कार्य जीवनी । दैव जिंकुनि ।।
करा सुकदानी। ही ग्रामगीतेची वाणी सृजन हो।

हृदयस्पशी भावनांचा जेव्हा जन्म व्हायला लागतो, जेव्हा समाजामध्ये अराजकतामाजून मानव तुच्छ कृत्याकडे वळून संपूर्ण मानव जातीचे अहीत चिंततो तेव्हा, ज्याप्रमाणे घनघोर तिमिरात हरवलेल्यांना नव्या किरणाची झलक दिसून तो काजवा मार्ग दाखविण्यास प्रेरक ठरतो त्याचप्रमाणे भरकटलेल्या या समाजाला एक सर्वहित करणारी 'ग्रामगीता' संजीवनी लाभली.

सर्वसंत ग्रंथाचा सार असा हा 'ग्रामगीता' ग्रंथ. यात सर्वधर्माचा समन्वय, विश्वाशांतीचा उपाय, लोकसुधारणेचे विद्यालय, ब्रह्मज्ञानाला संक्रियता देऊन जीवनात समत्व घडवून आणणाऱ्या संतबोधावर आधारित समाजरचनेचा मार्ग, आत्मोन्नती, ग्रामोन्नती साध्य करून प्रत्येक गाव व प्रत्येक नागरिक स्वावलंबी स्वयंशासीत व स्वयंपूर्ण बनविण्याचे शास्त्र, जीवनाशी संबंधित असलेले घटक लग्न, मृत्यू, सण, उत्सव, तीर्थयात्रा आदींचे सर्वतत्त्वज्ञान अशी एकूण मानवाची जीवनयात्रा कशीसफल होईल असे सर्व तत्त्वज्ञान भरलेले असून हा ग्रंथ आजच्या समाजाला तिमिरातून पहाटेची चाहूल करून देणारा भाष्करच आहे.

भगवद्गीतेच्या सक्रीय रूपात गावाचा कोणीही माणूस मागासला राहू नये तो अर्जुनासारखा सर्वांगीण सामर्थ्यवान बनावा याप्रेरणेने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे अमर प्रासादिकवाणीद्वारे निसर्गतःच प्रगट झालेला आहे.तो गुरुशास्त्र स्वानुभवसम्मत असूनत्यातील तत्वज्ञान मानवी जीवनाच्या प्रत्येक प्रसंगी क्षणोक्षणी मार्गदर्शक ठरणारे आहे.

नकळत मानवसमाज वासनेच्या आहारी जाऊन आपल्या गरजा पूर्ण करण्याकरिता कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्यास तयार असतो आणि आज तर जग विज्ञानाच्या मागे लागून सर्व बाजूने विश्वात अशांती होण्याचे वातावरण निर्माण झाले आहेत. अशा परिस्थितीत या अखिल विश्वाला शांतीचा मार्ग दाखविणारे एकमेव विचाररूपी शास्त्र म्हणजे 'ग्रामगीता' होय. या विश्वास अशांती निर्माण होण्याचे कारण काय? आणि त्याचा तोडगा काय? याचे उत्तर राष्ट्रसंतांनी किती तरी वर्षाअगोदर आपल्या ग्रंथराजात दिला आहे आणि अखिल विश्वाच्या निर्मितीकरिता त्यांनी ही ग्रामगीता ग्रामनाथाला अर्पण करतानाच म्हटले आहे

'ग्रामनाथा तुझशी करतो अर्पणतू विश्वाचे अधिष्ठान।
तुझेची व्हावे अधिउद्यान। विश्वा माझे म्हणोनिया।
ऐसेची व्हाव जनीवनी संतोष होईल माझेया म्हणी
मित्रत्व वाढे त्रिभूवनी तुकड्या म्हणे ध्येय हेचि ॥

याचा अर्थ हाच की, विश्वामध्ये मित्रत्व आणि शांती राहाणे हेच ग्रामगीतेचे ध्येय आहे.

ग्रामगीता ग्रंथराज्याच्या 'प्रार्थना व विश्वधर्म' या अठ्ठाविसाव्या अध्यायात महाराज लिहितात

'धर्मात नाही हिंदू मुसलमान । धर्मात नाही पार्शी ख्रिश्चन।
धर्मात नाही शिख जैन। पाहता मुळी।'

आज समाजामध्ये धर्माच्या नावावर मानव आपआपसामध्ये भांडणे करून आपल्याच भावंडाची कत्तल करू लागला आहे. साबरमती एक्सप्रेस धर्माच्या नावाखाली जाळली जाते हिंदू-मुसलामाचा द्वेष करतो. मुसलमान शिखांचा द्वेष करतो. शिख ख्रिश्चनांचा द्वेष करतात आणि या सर्वांच्या द्वेषामधून घडून येतो तो संहार, नरसंहार... ! मात्र हा नरसंहार होत असताना तो हा विचार करीत नाही की आपण किती मोठ्या अशांतीला निमंत्रण देत आहोत. ज्याने अखिल मानवाची दैनावस्था घडून येणार आहे. आपला भाऊ उद्या या संहाराने भाकरीलाच मोहताज होणार आहे. हे कोठपर्यंत चालणार? माणूस विश्वधर्म सोडून 'वासना धर्माच्या मागे लागला. आणि त्या वासनेमागे लागून तो धर्माची व्याख्या विसरून आपल्या स्वार्थालाच धर्म मानू लागला आहे आणि अशावेळेस धर्माची व्याख्या सांगताना महाराज म्हणतात,

"अनेक प्राणी जेथे राहती । त्या सर्वांची राहावी समान
समाधानाची गती। त्यास धर्म म्हणावे।
आत्मरूपाची धारणा । सर्वा ठायी समभावना।
विश्वकुटुंब ऐसा आचरणा। धर्मम्हणावे निश्चयी।"

अर्थात ज्यामध्ये अनेक प्राणी एकत्र येऊन आपली श्रेष्ठ-कनिष्ठता विसरून समाधानाने एकाच ठिकाणी गुण्यागोविंदाने नांदतात आणि ज्यांना प्रत्यक्ष आत्मरूपाची धारणा लाभते आणि सर्वांना जे समान मानतात जे या विश्वालाच आपले कुटुंब मानतात त्यालाच आपले धर्म समजावे.

धर्माच्या नावाकाली दंगली नको कारण धर्मात हिंदू नाही, मुसलमान नाही, पारशी, ख्रिश्चन नाही, शिख नाही, जैन नाही धर्म म्हणजे मानवता आणि जर आपण मानवतेलाच धर्म मानले तरच आपण विश्वाला कुटुंब मानू

जशी नांदावी सुखशांती। सर्वांना आचरावी बंधू प्रीती।
यासाठी झटले असती। महापुरुष अभेदत्वे ।।

या जगामध्ये सुखशांती नांदावी यासाठी सर्वांनी बंधूप्रीती आचारावी. सर्वांनी एकमेकासोबत प्रेमाने वागावे ऐसे घडण्याकरिता सर्वांचा परिचय ग्रामगीतेत आलेला आहे. महापुरुषांचे स्वप्न साकार करणारी महानशक्ती ग्रामगीतेच्या रूपाने विदर्भात अवतरली. सामाजिक स्वाथ टिकवूनठेवण्याचे महान कार्य या ग्रामगीतेद्वारेच पूर्ण होऊ शकते.

मानवाच्या मूलभूत गरजाम्हणजे अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीन गरजा जर पूर्ण होत नसेल तर तो ती पूर्ण करण्याकरिता निचतम् निच मार्गाचा अवलंब करतो याला इतिहास साक्षी आहे. आणि तद्पश्चात ह्या गरजा जसजशा पूर्ण होतात तसतशा त्याच्या मनीषा वाढतच राहातात. वास्तविक पाहाता मानव म्हणजे असंख्य आशा-आकांक्षांच्या छिद्रांनी फुटलेला हौदच आहे. त्या गरजा केव्हाही न संपणाऱ्या असतात आणि आपण जेव्हा या गरजांना पूर्णविराम देऊ तेव्हाच शांती प्रस्तापित होऊ शकते आणि या गरजा पूर्ण कशा व्हाव्यात याकरिता महाराजांनी गृहस्थाश्रम सांगितला आहे.

'आपुले घरचि नव्हे घर विश्व आपुले मकान सुंदर।
हेचि शिकावया असे संसार। उद्धार तो याच मार्गी ॥'

म्हणजे येथे आणि याच मार्गे माणसाच्या गरजांना पूर्णविराम लागू शकतो. यातून विश्वबंधूत्वाचा सुगंध दरवळत आहे.या अखिल विश्वालाच महाराजांनी आपले घरमानायला सांगितले आहे आणि याच मार्गे आपला उद्धार निश्चित आहे.

अनेक मानवांना एकत्र बांधणारी गोष्ट म्हणजे देव आणि धर्म होय माणूस धर्म आणि देवाच्या नावावर काहीही करण्यास तयार होतो म्हणूनच महाराजांनी ग्रंथराज ग्रामगीतेमध्ये पहिला अध्याय टाकला तो 'देवदर्शन' आणिदुसरा अध्याय म्हणजे 'धर्माध्ययन' याचा अर्थ हाच की मानवाने सर्वप्रथम देवाची आणि धर्माची व्याख्या जाणून घेऊन मगच तो जीवनाची खरी वाटचाल करू शकतो. त्याला देव म्हणजे काय? हेच कळलेले नसते. देवाच्या भाकड कल्पना डोक्यात घेऊन तो देवत्वाचा टेंभा मिरवित असतो आणि सर्वतोपरीतादैव वादावर अवलंबून राहातो असे सांगता राष्ट्रसंत ग्रामगीतेच्या पहिल्या अध्यायामध्ये सांगतात.

'एसे देवावरी विश्वासुनि। लोक झाले दुबळे मनी।
गाव भिकेला लागले याच गुणी। सोडा 'देव देवा' बोलणे॥'

सर्व काही देवावर अवलंबून चालत नाही असे परखड विचारांचे भोक्ता राष्ट्रसंत होते. दुसऱ्या महायुद्धात जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकीवर अमिरेकेने बॉम्ब हल्ला करून जपानला वेचिराख केले. सर्व विश्वासमध्ये अशांतीच स्थापन झाली. अशा परिस्थितीत जपानने महाराजांच्या याच ओळीचा मतितार्थ घेऊन आपले देवत्व वेशीला टांगले आमि कर्माला आणि देशप्रेमाला देव माणून सत्कर्म केले. परिणामी आज जपान प्रगतीच्या उच्च शिखरावर जाऊन पोहोचला ही ग्रामगीतेची जादुगिरी. ग्रामगीतेचा एकन एक शब्द जर जीवनात आचरला तर माणूस माणूस न राहाता तुकाराम महाराजांच्या म्हणण्याप्रमाणे 'देव पाहावयासी गेलो अन् तेथेची देव ठेलो' अर्थात् आपली प्रतिमा लोकांच्या मनामध्ये देवत्वाची ठसू लागते. अशी महान् ग्रामगीता आणि या विश्वामध्ये शांती प्रस्थापित करण्याकरिता ग्रामगीतेविना दुसरा मार्गच नाही.

विश्वामध्ये अशांती निर्माण होणे महत्त्वाचे कारण म्हणजे वासना होय. माणूस वासनेच्या मागे लागला तर तो वासनापूर्ती करिता अनाचार, अत्याचार यासारख्या मार्गाने पळू लागतो. उदाहरण घ्यावयाचे झाले तर पैशाच्या वासनेपायी अमिरेकेच्या पॅन्ट्यागॉन सभागृहावर झालेला अमानुषकृतीय तो बॉम्ब हटला घ्यावा लागेल. ज्यामध्ये किती तरीमानव हानी आणि वित्तहानीला विश्वाला तोंड द्यावे लागले. आजच्या विज्ञान युगात हे संपूर्ण जग म्हणजे एक देश झाला आहे. त्यामुळे पृथ्वीच्या कोणत्याही कोपऱ्यामध्ये कशीही हानीझाली तरी त्याची पूर्णतः झड संपूर्ण विश्वाला भोगावी लागते. यामुळे या वासनेला आळा बसावा याकरिता महाराजांनी ग्रामगीतेमध्ये आचारप्राबल्य, ब्रह्मचर्याश्रम, संघटनशक्ती, जीवनशिक्षण, प्रयत्न प्रभाव, प्रार्थना व विश्वधर्म यासारखे शांती आणि परिवर्तनमय अध्याय लिहून संपूर्ण मानव जातीला उपकृत केले आहेत.

सर्वप्रथम मनावर संस्कार होणे महत्त्वाचे असते. ज्याप्रमाणे कोळसा आपण सावणीने कितीही धुतला, घासला तो उगळला तरी तो शेवटपर्यंत काळाच राहाणार आहे. परंतु त्या कोळशाला जर अग्नीची संगत मिळाली तर तो त्या अग्नीसंस्कारामध्ये जळून योग्य रूपाने पांढरा होतो. त्याचप्रमाणे मानवाचे आहे. ज्याप्रमाणे मानवाला संगती मिळेल त्याचप्रमाणे त्याचे विचार-आचारक बनत असतात. म्हणून त्यावर योग्य संस्कार करण्याकरिता ग्रामगीतेमध्ये 'ससंग प्रभाव' नावाचा हा अध्याय लिहिला.

मानवाचे संपूर्ण विचार घडविण्यामागे सर्वात मोठा हातभार असतो तो त्याच्या आईचा. म्हणून महिलांवर योग्य संस्कार व्हावे आणि तिला तिच्या कर्तव्याची पुरेपूर जाणीव व्हावी याकरिता महाराजांनी ग्रामगीतेमध्ये विसावा अध्याय 'महिलोन्नती लिहून काढला आहे. कारण वालकावर जे संस्कार होतात ते संस्कार त्याच्या गर्भापासून सुरू होतात हे महाराजांनी प्रकर्षाने नमूद केले आहे. म्हणून मुलंबाळं संस्कारीत बनावा याकरिता गर्भवती स्त्रीला श्रृंगार रस, श्रृंगारगीत, अदृष्टीयन पाहते, अवाच्च न बोलणे, मानव हितकारीक वागणे बाध्य केले आहेत. या तत्त्वाचे पालन केले तर मुलगा सुसंस्कारिक जन्माला येऊन तोच विश्वशांतीचा मार्ग दाखवू लागतो. कदाचित स्त्रीच्या अज्ञानामुळे मुलगा जर कुसंस्कारित निघाला तर स्त्री त्याला वठणीवर आणण्याचे तंत्र जाणते कारण या तिन्ही लोकामध्ये स्त्रीसारखी मोहिनी, स्त्रीसारखी रागिनी आणि स्त्रीसारखी योगिनी दुसरी तिसरी कोणीच नाही. कारण स्त्री ही कोणाची माता असते तर कोणाची कांता असते तर कुणाची बहीण असते तर कुणाची मुलगी असते अशा अनेक पात्रामधून जाऊन ती एक कुंटन बनून परिवर्तनाची भाषा जाणीत असते. हाच पदभा दृष्टीसमोर ठेवून महाराजांनी 'महिलोन्नती मध्ये मातृगौरव केला आहे.

'विद्या गुरुहोनी थोर। आदर्श मातेचे उपकार।
गर्भापासूननी तिचे संस्कार। बालकावरी।।

ग्रामगीतेमध्ये गुरुलाही दूर सारले नाही. राष्ट्रनिर्मितीकरिता आणि शिक्षणाचे महत्त्व सांगताना महाराज लिहितात, 'ग्रामोन्नतीचा पाया शिक्षण । उद्याचे राष्ट्र, आजचे संतान । यासाठी आदर्श पाहिजेत गुरुजन । राष्ट्रा निर्माते।

ग्रामगीतेमध्ये गुरुजनांना राष्ट्रसंतांनी राष्ट्रनिर्माते म्हटले विद्यार्थी जर आदर्श झाले तर चहूकडे शांतता निर्माण होऊ शकते.

'गुरुजनी घ्यावे ऐसे घडे। आपला आदर्श ठेवूनी पुढे ।
विद्यार्थी तयार होता चहूकडे। राष्ट्र होईल तेजस्वी।

ISSN : 2278-9308
February, 2022

विश्वाच्या शांतीकरिता पोषक ठरणारा अतिशय महत्त्वाचा घटक म्हणजे विद्यार्थी होय. आणि त्या विद्यार्थ्यांच्या संस्काराची मालिका राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेमध्ये मांडली आहे. त्याचबरोबर विश्वशांतीचा उपाय म्हणून महाराजांनी कलेलाहीमहत्त्व दिले आहे.

कलेकरिता कला न ठेवी । जीवनाशी कला भूषवी।
आपण समजूनी दुसऱ्या दाखवी। मनुष्यपण गोडशब्दे॥

वास्तविक पाहाताक लेने माणूस माणसाच्या जवळ येतो. कुणाजवळ हस्तकला, चित्रकला, गानकला. गोड बोलण्याची कला आदि कला द्वारे मानव आकर्षित होऊन त्याचे गुण घेण्याचा प्रयत्न करतो आणि त्याचे गुणामध्ये दूरतेचा लेश झालेला असतो. म्हणून कलाकरिता कला न राहाता ते जीवनाचा एक अविभाज्य घटक बनून विश्वशांती जोपासण्यास प्रेरक मार्गदर्शक ठरते.

संदर्भ ग्रंथ

१) राष्ट्रसंतांची 'ग्रामगीता' :- लेखक डॉ. सुभाष सावरकर
२) राष्ट्रसंत आणि ग्रामगीता :- लेखक डॉ. सुभाष सावरकर
३) ग्रामगीता रहस्यस्वंद १ :- लेखक डॉ. सुभाष सावरकर
४)ग्रामगीता रहस्यस्वंद १ :- लेखक डॉ. सुभाष सावरकर
५)ग्रामगीता रहस्यस्वंद १ :- लेखक डॉ. सुभाष सावरकर